रेशीम शेती व उद्योग विकास
प्रचार व प्रसिध्दी योजनेला मान्यता देणेबाबत

# महाराष्ट्र शासन

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : प्राावियो - १०१८/ प्र. क्र. १९/ रेशीम कक्ष**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगूरु चौक

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १८ एप्रिल, २०१८

**वाचा-**

१. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय, वस्त्रोद्योग धोरण - २०१८-२३, दिनांक १५ फेब्रूवारी, २०१८
२. संचालक (रेशीम )यांचे पत्र क्र. कार्या. ८/ जिवायो/प्रचार प्रसिध्दी/१७-१८/२१८०, दिनांक २६ मार्च, २०१८

**प्रस्तावना-**

राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ हे शासन निर्णय १५.२.२०१८ अन्वये जाहीर करण्यात आले आहे. या धोरणात रेशीम शेती व त्या आधारीत पुरक उद्योगाला प्रोत्साहन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. रेशीम उद्योग हा शेती व वन संपत्तीवर आधारीत रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला उद्योग आहे. राज्यामधील हवामान हे रेशीम शेतीसाठी पोषक आहे. वातावरणाच्या लहरीपणामूळे होणारे नुकसान टाळण्यासाठी तसेच नियमित उत्पन्न मिळविण्यासाठी रेशीम उद्योग हा राज्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न मिळवून देण्याचे सामर्थ्य रेशीम शेती व उद्योगांमध्ये आहे. राज्यात रेशीम उद्योगाचा विस्तार व विकास व्हावा यासाठी राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या अनेक योजना कार्यरत आहेत. राज्यात रेशीम संचालनालयाची स्थापना १ सप्टेंबर, १९९७ रोजी झाली आहे. रेशीम संचालनालयाच्या स्थापनेपासून ते अद्यापपर्यंत शासनाकडून विविध योजना राबवून देखील या योजनांची अद्यापपर्यंत राज्यव्यापी प्रचार व प्रसिध्दी न केल्याने प्रस्तुत योजना शेतकरी / उद्योजकांपर्यंत पोहोचत नाहीत. त्यामुळे राज्याचे नवीन वस्त्रोद्योग धोरण १५.२.२०१८ मध्ये रेशीम शेती व उद्योगाला चालना देण्यासाठी राज्यव्यापी प्रचार व प्रसिध्दी देण्याचा निर्णय मंत्रीमंडळाच्या मान्यतेने घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने रेशीम शेती व उद्योगाची राज्यव्यापी प्रचार व प्रसिध्दी करणे आवश्यक असल्याने या विभागांतर्गत “रेशीम उद्योगाचा प्रचार व प्रसिध्दी” ही योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

रेशीम शेती व उद्योग राज्यातील सर्व घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी रेशीम शेतीचा प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात वस्त्रोद्योग विभागांतर्गत रु. १.००कोटी इतका नियतव्यय राखून ठेवण्यात आला आहे. त्यास अनूसरुन राज्यातील रेशीम उद्योगाची जाहिरात व प्रसिध्दीसाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम हाती घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

१) **महारेशीम अभियान राबविणे** :-

राज्यातील सर्व शेतकऱ्यांना रेशीम उद्योगाची माहिती देऊन तुती लागवड करू इच्छीणाऱ्या नवीन शेतकऱ्यांना व टसर उद्योग करु इच्छीणाऱ्या लाभार्थ्यांची नवीन नोंदणी करण्यासाठी दर वर्षी नोव्हेंबर ते डिसेंबर या कालावधीत राज्यभर रेशीम शेतीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी महारेशीम अभियान राबविण्यात येईल. प्रस्तुत महारेशीम अभियानाची तसेच त्याबाबतच्या योजनांची माहिती व जनसंपर्क महासंचालनालयांतर्गत विविध माध्यंमाव्दारे त्यांनी निर्गमित केलेल्या दिनांक २१ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयाव्दारे विहीत केलेल्या मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने राज्यव्यापी प्रचार व प्रसिध्दी सप्टेंबर ते ऑक्टोंबर या कालावधित करण्यात येईल.

महारेशीम अभियानांतर्गत तुती लागवडीसाठी पोषक हवामान असलेली तसेच टसर कोष उत्पादन करणाऱ्या जिल्ह्यात हे अभियान प्रामुख्याने राबविण्यासाठी त्या भागातील शेतकऱ्यांपर्यंत व उद्योजकांपर्यंत शासनाच्या योजनेचा प्रचार करण्यासाठी व त्यांतर्गत नोंदणी करण्यासाठी रेशीम संचालनालयाकडून उपलब्ध मनुष्यबळ यांचेसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पूणे (बार्टी) या संस्थेच्या समतादूतांची सेवा घेण्यात येईल. प्रस्तुत समतादुतांचे मानधन या योजनेतील तरतुदीमधुन देण्यात येईल. इतर खर्च जसे की, शेतकरी अभ्यास दौरा, शेतकरी प्रशिक्षण, मेळावे, व जिल्हापातळीवरचा रेशीमरथ, भित्तीपत्रके, चर्चासत्रे, हस्तपत्रिकेव्दारे केला जाणारा प्रचार इ. नियमीत बाबींचा खर्च जिल्हा वार्षिक योजनेमधील प्रचार व प्रसिध्दीच्या तरतूदीमधून तसेच इतर संबधित विविध मंजूर योजनांमधील तरतूदीमधून भागविण्यात यावा. रेशीम संचालनालयाने या अभियानादरम्यान रेशीम उद्योगात तुती लागवडी पासुन ते रेशीम कपडा तयार करणे या प्रक्रीयेची माहिती द्दकश्राव्य (Audio Visual) माध्यमातून देण्यासाठी डॉक्यूमेंटरी फिल्म (ध्वनी चित्रफीत) तयार करून त्या-त्या हंगामात शेतकरी/उद्योजक यांना दाखविण्यात याव्यात तसेच रेशीमरथ, भित्तीपत्रके, चर्चासत्रे इत्यादी बाबींचा प्रभावीपणे वापर करावा.

२) **प्रचार व प्रसिध्दी माध्यमे:-**

रेशीम उद्योग प्रामुख्याने महाराष्ट्रातील ग्रामीण भागात राबविला जातो. त्यामुळे रेशीम उद्योगाचा राज्यस्तरीय प्रचार व प्रसिध्दी करण्याकरीता ग्रामीण भागात पोहोचणा-या व नियमीतपणे नजरेस पडणा-या माध्यमांचा वापर होणे गरजेचे आहे. यास्तव रेशीम उद्योगाचा प्रसारासाठी खालील प्रचार साधने/माध्यमांचा प्रभावी उपयोग करण्यात येईल.

अ) राज्यस्तरीय प्रचार प्रसिध्दीकरीता रेशीम अभियान कालावधीत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांवर योजनेसंबधीचे होर्डींग्स लावणे व उदघोषणा / जिंगल्स प्रसारीत करण्यात येतील. तसेच बसेसवर रेशीम शेतीची माहिती देणारे पोस्टर्स व बॅनर्स लावण्यात येतील.

ब) ग्रामपंचायत कार्यालयात रेशीम योजनांचे माहिती दर्शविणारे फलक / बॅनर्स लावण्यात येतील.

क) शेतक-यांच्या यशोगाथा, मुलाखती या कृषीविषयक नियतकालीके, सह्याद्री वाहिनीवर तसेच आकाशवाणीवर प्रसारीत करण्यात याव्यात. आकाशवाणी तसेच FM द्वारे प्रचार “जिंगल्स” व्दारे प्रसिध्दी करण्यात यावी.

ड) तालूका व जिल्हा पातळीवर आदर्श रेशीम शेतकऱ्यांची निवड करुन पारितोषिक देणे तसेच मानचिन्हं व प्रशस्तीपत्र देण्यात गौरव करण्यात येईल

इ) राज्यात रेशीम उद्योगातून निर्माण होणारी उत्पादने यांची मुंबई, पुणे व नागपूर अशा मोठया शहरांमध्ये प्रदर्शने आयोजित करणे, राज्यात रेशीम शेती पासून निर्माण होणाऱ्या उत्पादनांचे ब्रँडींग करण्यात येईल.

३) प्रस्तुत योजनेची प्रचार व प्रसिध्दी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २१ जुलै, २०१७ मध्ये नमूद केलेल्या शासकीय जाहिरात वितरण धोरणानुसार होईल.

४) सदर योजनेला वरील प्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात आल्यानंतर अर्थसंकल्पीय तरतुदीसाठी नवीन लेखाशीर्ष उघडण्यासाठी नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेने प्रस्ताव महालेखापाल यांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येईल.

५) उपरोक्त खर्च भागविण्यासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून उपसचिव, (रेशीम कक्ष) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

६) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१९१३२००९४८०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashish Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c,
serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2018.04.19 14:30:34 +05'30'

(आ. अ. लोपिस)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा.मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

४. मा.राज्यमंत्री सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

५. अप्पर मुख्य सचिव, (सहकार) यांचे स्वीय सहायक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई,

६. अप्पर मुख्य सचिव (पणन) यांचे स्वीय सहायक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई,

७. सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहायक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई,

८. संचालक (रेशीम) रेशीम संचालनालय नागपूर,

९. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,

१०. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर,

११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

१२. निवासी व लेखापरीक्षा अधिकारी,मुंबई,

१३. उप सचिव (वस्त्रोद्योग-रेशीम), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई,

१४. निवड नस्ती - रेशीम कक्ष.